# राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० मधील मल्टीपल एन्ट्री अँड एक्झिट सुविधेमुळे विद्यार्थ्यांच्या गळतीचे प्रमाण कमी होण्यातील योगदान

**प्रा. डॉ. किरण अमृत वारके**
संशोधन मार्गदर्शक,
भुसावळ कला, विज्ञान आणि पु.ओ. नाहटा महाविद्यालय, भुसावळ – ४२५५०१

**श्री. सरदार मधुकर ठाकरे**
संशोधक विद्यार्थी,
KBCNMU/11/Ph.D./Eco/719/2023

**सारांश :**

*नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० हे शिक्षण प्रक्रीयाला नवीन दिशा देण्याचे कार्य करत आहे. यामुळे शिक्षण प्रक्रियेत आमुलाग्र बदल घडून येतील. नवीन शैक्षणिक धोरण हे नाविण्यतेने परिपूर्ण असलेले धोरण आहे. या धोरणात 'मल्टीपल एन्ट्री अँड एक्झिट' सारखी सुविधा देण्यात आलेली आहे. यामुळे विद्यार्थ्यांवर येणारा शैक्षणिक, आर्थिक, सामाजिक व अन्य ताण कमी होऊन विद्यार्थ्याला एक आनंदमय व समस्याविरहीत वातावरणात आपले शिक्षण पूर्ण करता येणार आहे. यामुळे विद्यार्थी आपल्या पसंतीनुसार विषय निवडीला प्राध्यान्य देऊ शकतो त्याचबरोबर एखाद्या विशिष्ट संथेत विद्यार्थ्याला काही कारनास्थव शिक्षण शिक्षण पूर्ण करता येत नसेल तर, विद्यार्थी आपल्या ABC चा वापर करून आपले साठवलेले क्रेडीट दुसऱ्या संस्थेत वापरून आपला प्रवेश विशिष्ट स्तरावर करून शिक्षण पूर्ण करू शकतो.*

**मुख्य शब्द :** राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२०, मल्टीपल एन्ट्री अँड एक्झिट, विद्यार्थी गळती ई.

**प्रस्तावना :**

१९४७ मध्ये भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर भारताच्या संविधानातच शिक्षण विषयक तरतुदी करण्यात आल्या होत्या. सर्वप्रथम १९४८ साली विद्यापीठ आयोगाची स्थापना करून पुढे १९५२ माध्यमिक शिक्षणआयोग, १९६४ मध्ये कोठारी आयोग, शिक्षण व्यवस्थेत आमुलाग्र बदल घडून आणण्यासाठी व राष्ट्राला एक नवी दिशा देण्यासाठी वेळोवेळी शिक्षण आयोगांची स्थापना करण्यात आली.

२१ व्या शतकात ३४ वर्षानंतर २०१९ मध्ये नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाचा मसुदा मांडण्यात आला व २०२० नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणात विविध आवश्यक ते बदल करण्यात आले. या नवीन धोरणात विविध पैलूंवरती प्रकाश टाकण्यात आलेला आहे. उदा. दर्जेदार विद्यापिठांची निर्मिती, बालकांचे संगोपन, विद्यार्थी गळती रोखणे, शिक्षणाचे विकेंद्रीकरण करणे, बहुशाखीय शैक्षणिक दिशा अशा अनेक पैलूंवर प्रकाश टाकलेला आहे. एकंदरीत या नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणामध्ये विविध नवीन बाबींचा समावेश झालेला आहे. पूर्वीच्या शिक्षण पद्धतीमध्ये एखाद्या विद्यार्थ्याला मधेच शिक्षण सोडून दुसऱ्या शाखेत प्रवेश घ्यायचा असेल तर त्याचे अर्धवट सोडलेले शिक्षण हे पूर्णतः वाया जायचे व त्या विद्यात्र्याला नवीन प्रवेश दुसऱ्या शाखेत घ्यावा लागत असे, पण या नवीन शैक्षणिक धोरणामुळे शिक्षणात होणारी गळती आता कमी होणार आहे. कारण या नवीन धोरणामुळे विद्यार्थ्याला आता अकॅडेमिक बँक ऑफ क्रेडीट (ABC) व मल्टीपल एन्ट्री अंड एक्झिट ची सुविधा उपलब्ध करून देण्यात आलेली आहे. यामुळे विद्यार्थी आपल्या आवडीच्या क्षेत्रात आपल्या पसंती विषयांना प्राध्यान्य देऊन आपले शिक्षण पूर्ण करू शकतो. म्हणजेच या नवीन शैक्षणिक धोरणामुळे एखादा कला शाखेचा विद्यार्थी देखील रसायनशास्त्र, भौतिकशास्त्र व अशा अन्य शाखेचा विषय घेऊन आपले शिक्षण पूर्ण करू शकतो.

**संशोधनाची उद्दिष्टे :**

१) राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० मधील मल्टीपल एन्ट्री अँड एक्झिट ही संकल्पना समजून घेणे.

२) मल्टीपल एन्ट्री अँड एक्झिट सुविधेमुळे विद्यार्थी गळतीवरील परिणाम अभ्यासने.

**संशोधन विषयाचे महत्व :**

शिक्षण प्रक्रियेतील विद्यार्थी, पालक, शिक्षक व संचालक मंडळ या सर्व घटकांना शैक्षणिक धोरणांविषयी माहिती असेलच असे नाही, नवीन येऊ घातलेल्या या राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० च्या अनुषंगाने शैक्षणिक प्रक्रियेमध्ये कोणकोणते बदल येऊ घातले आहेत ? या धोरणामुळे शिक्षण क्षेत्रातील कोणत्या घटकांवर काय परिणाम दिसून येणार आहे ? या धोरणामुळे शिक्षणात लवचिकता प्रस्तापित होईल का ? विद्यार्थ्यांचा विचार करून किंवा मध्यस्थानी ठेवून हे शैक्षणिक धोरण तयार करण्यात आले आहे का ? या सर्व प्रश्नांची उत्तरे या नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाचा अभ्यास केल्या नंतर शैक्षणिक प्रक्रियेतील सर्व घटकांना मिळणार आहेत. प्रस्तुत संशोधनामुळे मल्टीपल एन्ट्री अंड एक्झिट नेमकं काय आहे. यामुळे विद्यार्थ्यांना

कशाप्रकारे फायदा होईल व संस्थेसाठी नेमक्या कशा पद्धतीची कार्यप्रणाली असेल याची माहिती या संशोधनातून विद्यार्थी, पालक, शिक्षक व संचालक मंडळ यांना होईल म्हणून प्रस्तुत संशोधन विषय अभ्यासने हे महत्वाचे आहे.

**अकॅडेमिक बँक ऑफ क्रेडीट (ABC) :**

नवीन शैक्षणिक धोरणानुसार सर्व शैक्षणिक प्रक्रियेत सहभागी असलेल्या विद्यार्थ्यांना अकॅडेमिक बँक ऑफ क्रेडीट (ABC) मध्ये आपले शैक्षणिक खाते उघडावे लागेल व सर्व विद्यार्थांची शैक्षणिक क्रेडीटची नोंदणी या खात्यांमध्ये केली जाईल, विद्यार्थ्यांच्या सर्व शैक्षणिक प्रगतीची नोंदणी यात केली जाईल व पुढील शिक्षणासाठी विद्यार्थी या क्रेडीटचा वापर करून आपले शिक्षण पूर्ण करू शकेल. यासाठी पुढीलप्रमाणे क्रेडीट वर्ष निहाय ठरविण्यात आलेले आहेत-

| अ. क्र. | शैक्षणिक वर्ष | पदवी | क्रेडीट | संधी |
|---|---|---|---|---|
| १. | १ वर्ष शिक्षण पूर्ण केल्यास | प्रमाणपत्र | ४० क्रेडीट | व्यावसायिक कौशल्यांसाठी उपयुक्त |
| २. | २ वर्ष शिक्षण पूर्ण केल्यास | डिप्लोमा | ८० क्रेडीट | तांत्रिक नोकरीच्या संधी |
| ३. | ३ वर्ष शिक्षण पूर्ण केल्यास | बॅचलर पदवी | १२० क्रेडीट | स्पर्धा परीक्षा आणि सामान्य नोकरीसाठी पात्र |
| ४. | ४ वर्ष शिक्षण पूर्ण केल्यास | संशोधनासह पदवी | १६० क्रेडीट | थेट Ph.D. साठी प्रवेश |

त्याचबरोबर विद्यार्थी जर ४ वर्षाचा पदवी अभ्यासक्रम पूर्ण करून १ वर्षाची PG ची पदवी प्राप्त करत असेत तर, अशा विद्यार्थ्याला सरल Ph.D. साठी प्रवेश घेणे शक्य होईल.

**मल्टीपल एन्ट्री अँड एक्झिट : विद्यार्थ्यांच्या गळतीचे प्रमाण कमी होण्यातील योगदान -**

शिक्षण प्रकीयेमध्ये विद्यार्थी हा केंद्रस्थानी मनाला जातो, म्हणून विद्यार्थ्यांच्या सर्व अंगांच्या विकासाबरोबरच त्या विद्यार्थ्याला येणाऱ्या अडचणींचा देखील तेवढयाच आत्मीयतेने विचार करणे गरजेचे आहे. विद्यार्थी शिक्षण प्रक्रियेत विवध क्षेत्रातून येत असतो, उदा. विशेष गरजा असलेला विद्यार्थी, मागास वर्गातून येणारे विद्यार्थी, आर्थिकदृष्ट्या मागासलेला विद्यार्थी, झोपडपट्टीतील विद्यार्थी, दुर्गम भागात राहणारे विद्यार्थी, सामाजिकदृष्ट्या मागासलेले विद्यार्थी असे काही क्षेत्रे सांगता येतील.

विद्यार्थी जेव्हा अशा विविध क्षेत्रातून शिक्षण प्रक्रियेत सहभागी होतो तेव्हा त्याला अनेक अडचणींना सामोरे जावे लागत असते, आणि या अडचणीमुळे विद्यार्थ्याला आपले शिक्षण पूर्ण करता येत नाही.

१) **शिक्षणातील लवचिकता** – ज्यावेळेस विद्यार्थ्याला विविध सामाजिक, आर्थिक किंवा अन्य इतर कारणांमुळे शिक्षण अर्धवट सोडावे लागते, आणि विद्यार्थी जेव्हा पुन्हा प्रवेश घेतो तेव्हा विधार्थ्याचे कोणतेही शैक्षणिक नुकसान होत नाही व यामुळे आर्थिक भूर्दंड व मानसिक त्रासाला सामोरे जावे लागत नाही.

२) **ABC चा वापर** – विद्यार्थ्याच्या अकॅडेमिक बँकेत जतन झालेल्या क्रेडिटचा वापर आपल्या पुढील शिक्षणासाठी सहज करता येईल व आपले खंडीत झालेले शिक्षण विद्यार्थ्याला पूर्ण करणे शक्य होईल.

३) **विद्यार्थ्याला पुनः प्रवेश घेणे शक्य** – विद्यार्थ्याला पुनः त्याच टप्प्यावरून शिक्षण करणे या २०२० च्या नवीन शैक्षणिक धोरणात समाविष्ट झालेल्या 'मल्टीपल एन्ट्री अँड एक्झिट' च्या सुविधेमुळे शक्य होईल. यामुळे शिक्षण प्रक्रियेत होत चाललेली विद्यार्थ्यांची गळती रोखता येईल. व विद्यार्थी संख्या वाढवून एकंदरीत साक्षरता दर वाढविण्यास मदत होईल.

४) **विषय निवडीला प्राध्यान्य** – या नवीन शैक्षणिक धोरणामुळे विद्यार्थ्यांना आता सक्तीचे विषय न घेता त्याला स्वतःला आपल्या आवडीप्रमाणे विषय निवडता येते शक्य होणार आहे.

५) **वेळ व पैशाची बचत** – विद्यार्थी ज्या टप्प्यावरून एक्झिट करतो तिथूनच त्याला मर्यादित कालावधीत एन्ट्री देखील करता येते म्हणून गतकाळात जो वेळ आणि पैसा गेलेला आहे. तो विद्यार्थ्याला पुन्हा खर्च करण्याची गरज नाही.

६) **कौशल्य विकास** – १ किंवा २ वर्षात जे विद्यार्थी शिक्षणातून बाहेत पडतात अशा विद्यार्थ्यांना बाहेर पडल्यावर बेरोजगार सारख्या समस्येला सामोरे जावे लागत नाही तर आपली कौशल्य प्रमाणपत्र व डिप्लोमा प्रमाणपत्राचा वापर करून ते आपल्या प्राप्त कौशल्याच्या बळावर रोजगाराची निर्मिती करू शकतात.

७) **आर्थिक आडचनींवर तोडगा** – एखाद्या विद्यार्थ्याकडे पदवी किंवा पद्युत्तर शिक्षण पूर्ण करण्यासाठी पैशांची कमतरता असेल तर अशा विद्यार्थ्याला एक्झिट करून पैसे जमवून परत पुढील शिक्षणासाठी वाटचाल करता येईल.

ISSN : 3107-8591
Vol. 1, Issue 2, Oct – Dec 2025

**निष्कर्ष :**

नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० मधील 'मल्टीपल एन्ट्री अँड एक्झिट' या सुविधेमुळे विद्यार्थ्यांना आर्थिक, शैक्षणिक समस्यांना जमोरे जावे लागणार नाही. व या सुविधेमुळे विद्यार्थ्याला आपले अर्धवट शिक्षण पूर्ण करता येईल आणि शैक्षणिक संस्था देखील विद्यार्थ्यांना बदल करणे शक्य होईल व सक्तीच्या विषयांना बळी न विद्यार्थ्याला आपल्या वाढीनुसार विषय निवडीला प्राध्यान्य देता येईल. यामुळे एखाद्या कला शाखेच्या विद्यार्थ्याला देखील विज्ञान विषयातील विषय निवडता येतील व एखाद्या विद्यान शाखेतील विद्यार्थ्याला देखील कला, संगीत या सारख्या विषय निवडीला प्राध्यान्य देता येईल.

**संदर्भ -:**

१) शिक्षण मंत्रालय भारत सरकार (२०२०) : राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२०
२) गंगाधर वी. कायंदे – पाटील (२००६) : भारतीय शिक्षणाचा इतिगास : चैतन्य पब्लिकेशन, नाशिक.
३) मीनल नरवणे (२००६) : भारतातील शैक्षणिक आयोग व समित्या (१८१३ - १९९७) : नित्य - नूतन प्रकाशन.
४) दिपेश करमरकर (२००९) : शिक्षण आयोग ते ज्ञान आयोग, भारताचे शिक्षण धोरण आणि संबंधित आव्हाने : विकल्पवेध

***